दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १६१ • RNI : MAHMAR/2023/87818 • मंगळवार, दि.१५ एप्रिल २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# ‘मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार’ हे पद म्हणजे त्यांच्या खात्यात घुसखोरी; रोहित पवारांचा आरोप

## एकनाथ शिंदे यांच्यानंतर आता अजित दादांचा नंबर

**मुंबई (वृत्तसंस्था)–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ‘मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार’ हे राज्य मंत्रिपदाचा दर्जा असलेले पद निर्माण केले आहे. या निर्णयाच्या माध्यमातून त्यांची अजित पवार यांच्या अर्थ खात्यात घुसखोरी केली असल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. त्यांनी एका पोस्टच्या माध्यमातून या निर्णयावरून विद्यमान मुख्यमंत्र्यांचा नेहमीच एकाधिकारशाहीकडे कल असल्याचा आरोप केला आहे.या संदर्भात रोहित पवार यांनी देवेंद्र फडणवीस यांनी घेतलेल्या निर्णयावर टीका केली आहे. भाजपच्या शब्दकोशात मित्रपक्ष म्हणजे केवळ ‘तात्पुरती सोय’ एवढाच अर्थ आहे, त्यामुळे गरज संपताच तात्पुरती सोय देखील संपवायची ही भाजपची कार्यपद्धती असल्याचा आरोपही रोहित पवार यांनी केला आहे.**



मुख्यमंत्र्यांनी ‘मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार’ हे राज्य मंत्रिपदाचा दर्जा असलेले पद निर्माण करून एकप्रकारे अजित दादांच्या अर्थ खात्यात देखील घुसखोरी केलेली आहे. यापुढे अर्थ खात्याचे सर्वच धोरणात्मक निर्णय आणि पर्यायाने सर्वच प्रशासकीय निर्णय सुद्धा मुख्य आर्थिक सल्लागारांच्या पर्यायाने मुख्यमंत्र्यांच्या अखत्यारीत येतील. गेल्या अडीच वर्षात घेतलेल्या निर्णयांचा आढावा घेत आधी एकनाथ शिंदे साहेबांच्या खात्यांमध्ये घुसखोरी केली आता अजित दादांचा नंबर आहे. विद्यमान मुख्यमंत्र्यांचा नेहमीच एकाधिकारशा ही कडे कल राहिला असल्याने त्यांनी प्रत्येक मंत्रालय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे आपल्या नियंत्रणात ठेवण्यावर भर दिला असून मुख्य आर्थिक सल्लागार नेमण्याचा निर्णय देखील त्याच कार्यपद्धतीचा भाग आहे. लोकशाहीत सत्तेचे विकेंद्रीकरण आणि टीम वर्कचा रिझल्ट नेहमीच केंद्रीकृत सत्तेपेक्षा चांगला राहिला आहे, त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी आपल्या कार्यपद्धतीत बदल करणे महाराष्ट्राच्या हिताचे राहील.राहिला प्रश्न मित्रपक्षांचा, तर भाजपच्या शब्दकोशात मित्रपक्ष म्हणजे केवळ ‘तात्पुरती सोय’ एवढाच अर्थ आहे, त्यामुळे गरज संपताच तात्पुरती सोय देखील संपवायची ही भाजपची कार्यपद्धती आहे. भाजपची ही कूटनीती बाहेर राहून सर्वांना कळत असली तरी शिकार होणाऱ्या मित्रपक्षांना शिकार होईपर्यंत कळत नाही हे मात्र मित्रपक्षांचे दुर्दैव म्हणावं लागेल.

# नेवासा शहरात मावा व सुंगधीत तंबाखु विक्रेत्यांवर पोलिसांची कारवाई

## २,७४,०५० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

**पारनेर | प्रतिनिधी**

१३ एप्रिल २०२५ रोजी, परि. पोलीस उपअधीक्षक श्री. संतोष खाडे यांच्या नेतृत्वाखाली नेवासा शहरातील १२ ठिकाणी मावा आणि सुंगधीत तंबाखु विक्री करणाऱ्या आरोपींविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली. गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांना समजले की, काही व्यक्ती शरीरासाठी हानिकारक मावा व तंबाखु विकत आहेत.



पोलिसांनी तात्काळ कारवाई करत वेगवेगळ्या ठिकाणी छापे टाकले. यामध्ये २,७४,०५० रुपये किमतीचा मुददेमाल जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या मुददेमालात सुंगधीत तंबाखु, मावा तयार करण्याची मशीन आणि इतर खाद्यपदार्थ समाविष्ट आहेत. पोलिसांनी जप्ती पंचनामा करून आरोपींविरुद्ध कारवाई सुरू केली आहे. आरोपींपैकी परवेज इसाक शेख, वसीम मोहम्मद शेख, सुलेमान इसाक मनियार, अब्दुला अल्ताफ सय्यद, यासीन बाबा शेख, सय्यद अजीम सलीम, जावेद फज्जु शेख आणि अफरोश युसुफ शहा यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.पोलिसांनी संबंधित आरोपींविरुद्ध कठोर कारवाई करण्याचे आश्वासन दिले असून, शहरातील अशा प्रकारच्या विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत.

# भीम जैसा सूरज अगर निकला न होता हमारे जीवन में ये उजाला न होता

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याच्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त शुभेच्छा देत विनम्र अभिवादन केले आहे. यावेळी भीम जैसा सूरज आगर निकला न होता, हमारे जीवन में ये उजाला न होता, असे म्हणत एकनाथ शिंदे यांनी शायरीमधून बाबासाहेबांच्या प्रति भावना व्यक्त केल्या आहेत.



एकनाथ शिंदे म्हणाले, भारताच्या संविधानचे शिकल्पकार, युगप्रवर्तक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३४ वी जयंती आहे. या निमित्ताने मी बाबासाहेबांच्या तमाम अनुयायांना शुभेच्छा देतो व या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेबांना देखील विनम्र अभिवादन करतो. बाबासाहेबांनी सर्वसामान्य दलित, शोषित, पीडित, अन्यायग्रस्त यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम केले आणि समता, बंधुता आणि त्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवण्याचे काम केले.

पुढे बोलताना एकनाथ शिंदे म्हणाले, १८८१ साली बाबासाहेब यांचा जन्म आपल्या भारत भूमीत झाला आणि १९५६ साली त्यांचे महापरिनिर्वाण झाले. बाबासाहेबांचे स्मरण प्रत्येक नागरिकाला होत असतो. कारण बाबासाहेब आपला श्वास आहे, बाबासाहेब दीपस्तंभ आहेत. समतेचा संदेश देणारे बाबासाहेब त्यांनी या देशाला सर्वोत्तम घटना दिली. अनेक देशांच्या घटनेचा अभ्यास करून आपल्या देशाची घटना बनवली. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचला पाहिजे, ही भावना त्यांनी मनात ठेवली होती.

### पिशोर येथे युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

# वाघुळखेडा शिवारातील शेतात आढळला मृतदेह; पिशोर पोलिसांकडून तपास सुरू

**पिशोर | जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर परिसरात एक हृदयद्रावक घटना घडली असून, वाघुळखेडा शिवारातील एका शेतात चिकूच्या झाडाला गळफास घेऊन युवकाने आत्महत्या केल्याची घटना शुक्रवारी (दि. ११ एप्रिल) उघडकीस आली.




मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रकांत भाऊसाहेब बनकर (वय २६, रा. नरला भावडी ता. फुलंब्री) हा युवक आपल्या नातेवाईकांकडे कामानिमित्त पिशोर येथे येऊन गेल्या दोन वर्षांपासून येथील एका हेअर सलूनमध्ये काम करत होता. शुक्रवारी सकाळी शेषराव ढगे यांच्या वाघुळखेडा शिवारातील गट क्रमांक ६० मधील चिकूच्या झाडाला त्याने गळफास घेतल्याचे निदर्शनास आले.मृतावस्थेत आढळून आलेल्या चंद्रकांत बनकर याला तातडीने ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले, मात्र वैद्यकीय अधिकारी डॉ. अमोल गिरी यांनी तपासून त्याला मृत घोषित केले.या प्रकरणी पिशोर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, जमादार वसंत पाटील पुढील तपास करीत आहेत. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# कल्याण अल्पवयीन मुलीवर अत्याचार प्रकरण; आरोपीने कारागृहात केली आत्महत्या!

**ठाणे | प्रतिनिधी**

कल्याणमधील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीने आत्महत्या केली आहे. तळोजा कारागृहात आरोपी विशाल गवळी याने आत्महत्या करून स्वत:ला संपवलं आहे. तळोजा कारागृहात पहाटेच्या सुमारास आरोपीने गळफास घेतला. कल्याणमधील एका अल्पवयीन मुलीवर त्याने अत्याचार केल्यानंतर त्याला अटक करण्यात आलेली होती. त्यानंतर त्याची रवानगी तळोजा कारागृहात झाली होती. त्याच ठिकाणी त्याने रविवारी पहाटे गळफास लाऊन घेतला. गेल्या साडेतीन महिन्यांपासून विशाल गवळी हा तळोजा कारागृहात होता.

गवळी याने कल्याणमधील कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका अल्पवयीन मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केली होती. त्यानंतर त्याने या मुलीचा मृतदेह सुमारे १३ किलोमीटर दूर अंतरावर नेऊन टाकला होता. तसेच तो शेगाव येथे जाऊन लपला होता.या




प्रकरणी पीडित मुलीच्या पालकांनी २२ डिसेंबर रोजी मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार पोलिसांत दिली होती. त्यानंतर पोलिसांनी तपासाची सूत्रे हलवत या मुलीचा शोध घेण्यास सुरुवात केली होती. अखेरीस दुसऱ्यादिवशी घरापासून सुमारे १३ किमी अंतरावर या मुलीचा मृतदेह पोलिसांना सापडला होता.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत पोलिसांची सहा पथके सीसीटीव्हीच्या माध्यमातून तपास करत होती. ज्या परिसरात मुलगी राहत होती तेथील सीसीटीव्हीमध्ये ती परिसराच्या बाहेर पडल्याचे दिसून आले नाही. त्या अनुषंगाने पोलिसांनी आसपासच्या घरांमध्ये शोध घेतला. यादरम्यान, एका घराबाहेर ठेवलेल्या बुटांवर रक्ताचे डाग असल्याचे पोलिसांना निदर्शनास आले. ज्या घराबाहेर हे बूट होते ते घर विशाल गवळीचे असल्याचे समोर आले होते.या आत्महत्या मुळे पीडितेला आणि तिच्या कुटुंबीयाला न्याय मिळण्याची भावना व्यक्त होत असताना दुसरीकडे माझ्या १०० किलो वजनाच्या भाऊ टॉवेलने कसे लटकून घेऊन आत्महत्या करू शकतो असा प्रश्न विशालच्या बहिणीने उपस्थित केला आहे.

# आ.मुनगंटीवार यांच्यामुळे आराध्याच्या कानाला लाभले आनंदाचे सूर

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने यशस्वी कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्याचे माजी वने सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकारामुळे एका कुटुंबातील लाडक्या लेकीच्या कानांना आनंदाचे सूर लाभले. सामाजिक भावनेतून निःस्वार्थ कार्य करणारे आ. मुनगंटीवार यांनी पुन्हा एकदा आनंदाची पेरणी करण्याचे काम केले आहे. निमित्त ठरले वाघमारे कुटुंबाचे. चंद्रपूर शहरातील नेहरू नगर वार्डात राहणाऱ्या वाघमारे कुटुंबियांसाठी १२ एप्रिल २०२५ हा दिवस आयुष्यभर लक्षात राहणारा ठरला. त्यांची मुलगी आराध्या मंगेश वाघमारे हिची कॉक्लियर इम्प्लांट ही अत्यंत महत्त्वाची आणि क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पार पडली. आ. श्री. मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतला नसता तर आम्हाला आज हा आनंद अनुभवता आला नसता, या शब्दांत वाघमारे कुटुंबाने आभार व्यक्त केले आहेत.

आराध्या अवघी १ वर्षांची असताना दोन्ही कानांना पूर्णतः बहिरेपणा असल्याचे निदान झाले होते. त्यामुळे वाघमारे कुटुंब चिंतेत होते. प्राथमिक उपचारांमध्ये काहीच यश न मिळाल्यानंतर त्यांनी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्याशी संपर्क साधला. त्यांनी अत्यंत संवेदनशीलतेने या प्रकरणाकडे लक्ष दिले. सागर खडसे यांना वाघमारे कुटुंबाला सहकार्य करण्याचे निर्देश दिले.आ. मुनगंटीवार यांनी वेळोवेळी योग्य मदत व पाठबळ दिल्यामुळे टाटा ट्रस्ट यांच्या सहकार्याने नागपूर येथील ऑरेंज सिटी रुग्णालयात इएनटी सर्जन डॉ. श्वेता लोहिया यांच्या मार्गदर्शनात आराध्याचे ऑपरेशन पार पडले. आज आराध्या ऐकू शकते, तिच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि तिच्या कुटुंबियांच्या डोळ्यांतील अश्रू या यशोगाथेची साक्ष देतात. वाघमारे कुटुंबाने सुधीर मुनगंटीवार यांचे विशेष आभार मानले आहेत. मंगेश वाघमारे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना आ. मुनगंटीवार यांना देवदूत म्हटले आहे. ‘आमच्यासाठी आ.सुधीर मुनगंटीवार देवदूत ठरले आहेत. त्यांच्या मदतीशिवाय हे शक्य झाले नसते. आरोग्य सेवेत मानवी दृष्टीकोन व संवेदनशील नेतृत्व किती महत्त्वाचे असते याचे हे उत्तम उदाहरण आहे. प्रत्यक्ष भेट घेऊन आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे आभार व्यक्त करणार आहो,’ अश्या भावना मंगेश वाघमारे यांनी व्यक्त केल्या.



# संपूर्ण गड किल्ल्यांवर सरकारचे दुर्लक्ष-जयंत पाटील यांची टीका

**पारनेर | प्रतिनिधी**

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारच्या गड किल्ल्यांच्या संवर्धनाच्या दुर्लक्षावर टीका केली. पाटील म्हणाले, सरकारचे गड किल्ल्यांवर लक्ष नाही. ज्या ठिकाणी प्रसिद्धी मिळते, त्या एक-दोन ठिकाणीच त्यांचे लक्ष आहे. ते विशेषतः धर्मवीर गडाच्या संवर्धनावर सरकारच्या दुर्लक्षाचे प्रमाण देत होते. या मोहिमेचा दुसरा टप्पा रविवारी श्रीगोंदा तालुक्यातील पेडगाव येथील धर्मवीर गडावर राबविण्यात आला. यावेळी आमदार हेमंत ओगले, माजी आमदार राहुल जगताप, राजेंद्र फाळके यांची उपस्थिती होती.

पाटील यांनी गड किल्ल्यांच्या संवर्धनाच्या विषयावर स्पष्टपणे सांगितले की, खासदार नीलेश लंके यांच्या संकल्पनेतून शिवजयंतीच्या औचित्याने गड किल्ल्यांच्या स्वच्छता मोहिमेची सुरूवात केली होती. यानंतर हजारो मावळे गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी सहभागी झाले होते.

पाटील यांनी म्हटले की, गड किल्ल्यांच्या संवर्धनासाठी सरकारला पुढाकार घ्यावा लागेल. महाराष्ट्र शासनाच्या ताब्यात असलेल्या किल्ल्यांचे अधिक संवर्धन होऊ शकते, जर सरकारने लक्ष दिले. खासकरून किल्ल्याबाहेरच्या झुडपांचे संवर्धन आवश्यक आहे, असे ते म्हणाले.धर्मवीर गडाच्या ऐतिहासिक महत्त्वावर देखील पाटील यांनी भाष्य केले. या गडावर छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने पकडले होते. आणि त्यांचा प्रचंड छळ याच गडावर झाला. यामुळे धर्मवीर गडाचे संवर्धन अत्यंत महत्त्वाचे आहे, असे ते म्हणाले.पाटील यांनी विविध धर्मीयांचा एकत्रित सहभाग दर्शविला. धर्मवीर गडाच्या मोहिमेत अनेक मुस्लिम बांधव सहभागी झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याविषयी सर्वधर्मीयांमध्ये आदर आहे, असे ते म्हणाले.मोहिमेत राज्याच्या विविध भागांतील हजारो तरुण सहभागी झाले होते. खा. नीलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली ही मोहिम मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहे.



# मंडळ अधिकाऱ्यांशी हुज्जत घालणाऱ्या रेती माफियाला अटक

**उमरखेड | प्रतिनिधी**

पैनगंगा नदी पात्रातून मौजा चिंचोली, निंगनुर परिसरात रेतीची चोरटी वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर निंगनूर येथील कोतवाल आणि मंडळ अधिकारी गजानन सुरोशे यांनी पाठलाग करून रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर अडविला. ट्रॅक्टर चालकाला माहिती विचारताना ट्रॅक्टर मालक मोटर सायकलने आला आणि मंडळ अधिकाऱ्याशी झटापट करत हुज्जत घालण्याचा प्रकार घडला. ही घटना गुरुवारी, १० एप्रिल रोजी घडली.

फुलसावंगीच्या पैनगंगा नदी पात्रात रेतीसाठी सोन्याच्या खाणेसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. येथे रेती तस्करी तसेच तस्करांची दादागिरी वाढली आहे. नदीपात्रातून थर्माकॉलच्या सहाय्याने ताफा तयार करून रेती उपसा केला जात आहे. त्या ठिकाणी खुर्शीद हाशम अब्दुल मुनाफ हा आपल्या बिना नंबरच्या निळ्या रंगाच्या ट्रॅक्टरद्वारे रेतीची वाहतूक करत होता. चिंचोली गावाजवळ गौण खनिज अवैध वाहतूक आणि उत्खननास आळा घालण्यासाठी स्थापन केलेल्या भरारी पथकाच्या मंडळ अधिकाऱ्यांनी ट्रॅक्टरचा पाठलाग करून थांबवला. त्यावेळी रेती वाहतूक परवान्याबद्दल विचारपूस करत असताना, हाशम खुर्शीद मोटर सायकलने आला आणि मंडळ अधिकाऱ्याशी झटापट करत हुज्जत घालली. त्याने ट्रॅक्टर चालकाला पळवून नेण्यास सांगितले. त्यामुळे आरोपी आणि चालकांविरुद्ध मंडळ अधिकाऱ्यांच्या तक्रारीवर महागाव पोलीस स्टेशनला बि.एन.एस. ३०३(२), २२१, १३२ महा महसूल संहितेच्या ४८(७), ४८(८) नुसार गुन्हे दाखल झाले होते.या गुन्ह्यात आज खुर्शीद हाशम याला त्याच्या राहत्या घरून अटक करण्यात आली. हि कारवाई पीएसआय राठोड, बिट जमादार सुहास कायटे, गजानन खरात, आतिष जारंडे आणि गजानन मस्के यांनी केली.

# धुळे-पिंपळनेर-नवापूर रस्त्यावर असलेल्या शिवमल्ल हनुमान मंदिरात जयंती साजरी

**धुळे | प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील पिंपळनेर-नवापूर रस्त्यावर स्थित शिवमल्ल हनुमान मंदिरात हनुमान जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या दिवशी २५९ शाखांमध्ये हनुमान जयंती उत्साहात साजरी केली गेली. यानिमित्ताने विश्व मानव रुहानी केंद्राने आध्यात्मिक प्रमुख संत बलजित सिंह जी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक स्थळांवर मोफत वैद्यकीय सेवा पुरवली.



पंच कैलाश पैकी चार कैलाश मणी महेश, आदी कैलाश, किन्नर कैलाश, श्रीखंड कैलाश, तसेच अमरनाथ आणि माता नैना देवी येथे ही वैद्यकीय सुविधा उपलब्ध केली गेली. २०१४ पासून, श्रावण महिन्यात कावड उत्सव दरम्यान ५७ ठिकाणी मोफत विश्राम, लंगर आणि वैद्यकीय सुविधा उपलब्ध करणे सुरू करण्यात आले आहे. याशिवाय, महाराष्ट्रातील वणी गडवरील आई सप्तशृंगी देवी मंदिरातही मोफत विश्राम, लंगर आणि वैद्यकीय सेवा देण्यात येते.दरवर्षी आश्रममध्ये चैत्र आणि आश्विन नवरात्र्यांच्या काळात भक्तांच्या सानिध्यात विविध धार्मिक कार्यक्रम मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**सोलापूर | प्रतिनिधी**

सोलापूर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयात स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री, भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतीय न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, समाजसुधारक, महामानव आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन विद्या विकास मंडळाने केले होते.



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला विद्या विकास मंडळाचे सचिव मा. विलासरावजी घुमरे सर यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक, कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य डॉ. एल.बी. पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची गोड गाणी आणि समाजप्रमुख ठरलेल्या त्यांच्या विचारांचा उल्लेख करत, त्यांच्या विचारांनी समाजाचे खूप मोठे परिवर्तन केले आणि त्यांची जयंती आम्हाला प्रेरणा देते. कार्यक्रमाच्या समारोपाप्रसंगी सर्व उपस्थितांनी बाबासाहेबांच्या विचारधारेचे पालन करण्याचा संकल्प केला.

# जय जवान अभियानाच्या वतीने डॉ.आंबेडकर यांना अनोखं अभिवादन

**गंगाखेड | प्रतिनिधी**

आज, १४ एप्रिल २०२५ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त गंगाखेड येथे आधुनिक भारताचे शिल्पकार बाबासाहेब अशा आशयाचे माहिती पत्रकाचे विमोचन करण्यात आले. या पत्रकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विविध कार्यांचा आढावा घेण्यात आला.

पत्रकात बाबासाहेबांच्या योगदानाचे उल्लेख करताना त्यांच्या आर्थिक धोरणांपासून ते शैक्षणिक, कृषी आणि महिलांच्या हक्कांसाठी केलेल्या संघर्षापर्यंतचा समावेश करण्यात आला होता. यामध्ये त्यांनी भारतीय संविधान निर्माण केले आणि प्रत्येक नागरिकाच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी त्यांचे योगदान अनमोल ठरले आहे.कार्यक्रमाच्या उद्घाटनावेळी जय जवान जय किसान मिशनचे संयोजक डॉ. शैलेश कदम, अमानुला , अशोक घोबाळे, साबणे, विजय भालेराव, रजेभाऊ गायवल, सचिन कसबे आणि राजरत्न पंडित यांची उपस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ पार पडलेल्या या कार्यक्रमात सर्वांनी भिमप्रतीज्ञा घेतली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर चलण्याचा संकल्प केला.कार्यक्रमाच्या शेवटी, सर्व उपस्थितांनी एक स्वरात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त शपथ घेतली, ज्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांवर चालण्याचे वचन दिले. जय भीम, जय संविधान! असे उद्घोष करत कार्यक्रम समारोप करण्यात आला.



# भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी




**चिमूर | प्रतिनिधी**

राजीव गांधी कन्या विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय शंकरपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे पर्यवेक्षक अनिल भांडारकर होते, तर प्रमुख पाहूने म्हणून शाळेचे ज्येष्ठ शिक्षक भगवान महाले सर उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करून केली. विद्यार्थ्यांच्या हस्ते मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकेत प्रभा वैरागडे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्यानंतर विद्यार्थ्यांची भाषणे झाली, तसेच शिक्षकांची भाषणे देखील झाली. कार्यक्रमाचे प्रमुख पाहूने श्री महाले सर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य समजावून सांगितले, तर कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल भांडारकर यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे संचालन पंकज चौधरी यांनी केले, तर आभार प्रदर्शन हजारे यांनी केले. कार्यक्रमात बहुसंख्येने विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# कलेच्या माध्यमातून परमानंद तिरानिक बनले आदिवासींचा आवाज

१५ एप्रिल हा जागतिक कला दिन म्हणून जगभरात साजरा केला जातो. युनेस्को आणि इंटरनॅशनल आर्ट असोसिएशन यांच्या वतीने साजऱ्या होणाऱ्या या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट कला जिवंत ठेवणे, कलाकारांचे योगदान अधोरेखित करणे आणि नव्या पिढीला कला क्षेत्राशी जोडणे हे आहे. कला ही केवळ सौंदर्याची निर्मिती नसून ती समाजाचा आरसा असते. विशेषतः आदिवासी भागातील कलाकार ही कला आपलं अस्तित्व, संघर्ष आणि संस्कृती जपण्यासाठी वापरत आहेत. अशाच प्रतिभावान कलाकारांपैकी एक म्हणजे वरोऱ्याचे ज्येष्ठ कलाकार परमानंद तिरानिक.

परमानंद तिरानिक हे चित्रकला, अक्षरकला, शिल्पकला आणि बांबुकलेसारख्या विविध माध्यमांतून आदिवासी समाजाच्या आयुष्याचं आणि संस्कृतीचं दर्शन घडवतात. त्यांच्या कलाकृती निसर्गप्रेरित असतात आणि त्या चित्रांच्या माध्यमातून ते आदिवासींचे जगणे, त्यांचे प्रश्न, तसेच त्यांची वेगळी जीवनदृष्टी मांडतात. त्यांनी देशविदेशातील विविध प्रदर्शनांमध्ये सहभाग घेतला असून, त्यांच्या कलेला अनेक नामांकित पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. कलेत दृष्टिहीनांसाठी



सुलभता यावी यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. दृष्टिहीन आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही चित्रकलेच्या माध्यमातून रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, यासाठी ते शासनाशी सातत्याने पत्रव्यवहार करत आहेत. परमानंद तिरानिक लघुपट, माहितीपट आणि सांस्कृतिक कार्यक्रमांतून दिव्यांगांचे प्रश्न प्रभावीपणे मांडतात. त्यांनी 'संविधानाचा जागर' या उपक्रमांतर्गत ५० पैशाच्या पोस्टकार्डावर संविधान उद्देशिकेचे हस्तलिखित प्रचार करत लोकांमध्ये जागृती केली. गेली २५ वर्षे ते महाराष्ट्र, गोवा, नंदुरबार, धुळे आणि गडचिरोलीतील आदिवासी जीवनशैलीवर संशोधन करत आहेत. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाच्या राष्ट्रीय पुरस्कार तसेच आचार्य पुरस्कार अशा अनेक सन्मानांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. माझ्या कलेतून आदिवासी समाजाचे जीवन, संस्कृती आणि विचारसरणी व्यापक समाजापर्यंत पोहोचवण्याचा मी प्रयत्न करत आहे, असे परमानंद तिरानिक अभिमानाने सांगतात. चित्रकलेच्या माध्यमातून परमानंद तिरानिक हे केवळ कलाकार नाहीत, तर आदिवासींचा बुलंद आवाज बनले आहेत.

# दहिगाव योजनेतील शेतकऱ्यांच्या जखमेवरती मीठ:पाणी नसतानाही पाणीपट्टी भरण्याच्या नोटीसा

**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील दहिगाव उपसा सिंचन योजनेतील २४ गावातील शेतकऱ्यांवर पाणी न मिळालेल्या परिस्थितीत पाणीपट्टी भरण्याची दबावाची कारवाई सुरू करण्यात आली आहे. पाणीपुरवठा सुरू होऊन महिना झाल्यावरही टेल भागातील शेतकऱ्यांना पाणी पोहोचलेले नाही, मात्र त्यांना पाणीपट्टी भरावं असा आदेश असलेल्या नोटीसा पोस्टाने प्राप्त झाल्या आहेत. शेतकरी सध्या या परिस्थितीत अत्यंत अडचणीत सापडले आहेत, कारण त्यांच्या उभ्या पिकांना पाण्याअभावी गंभीर नुकसान झाले आहे. पाणी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला असून, पाणी आंदोलनाच्या तयारीत असतानाच या नोटीसा आल्यामुळे शेतकऱ्यांचा असमर्थता आणि नाराजी व्यक्त केली आहे. यापूर्वी ७ एप्रिल रोजी रास्ता रोको आंदोलन होण्याची शक्यता होती, पण पाटबंधारे विभागाने लेखी आश्वासन दिल्यानंतर ते आंदोलन मागे घेतले गेले. परंतु, अजूनही पाणी न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचा विश्वास उडालेला आहे. त्यांना आता शंका येते आहे की लोकप्रतिनिधी आणि पाटबंधारे विभाग त्यांच्या आंदोलना विरोधात हे नोटीसीचे शस्त्र वापरत असतील का.शेतकऱ्यांच्या अडचणी आणि उभ्या पिकांच्या नुकसानामुळे ही परिस्थिती गंभीर बनली आहे, आणि लोकप्रतिनिधी आणि पाटबंधारे विभागाकडून योग्य व तत्पर उपायांची आवश्यकता निर्माण झाली आहे.



## काय आहे नोटीस?

**संबंधित नोटीसीमध्ये असे म्हटले आहे की, दहिगाव उपसा सिंचन योजनेच्या पाणीपुरवठ्याच्या हंगामाशी संबंधित पाणीपट्टी रक्कम, मागील थकबाकी आणि जादा आकारासह दर्शविली आहे. नोटीस प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांच्या आत पाणीपट्टी भरायची आहे. जर हा रकमा दिलेल्या मुदतीत भरली नाही, तर पाणीपुरवठा नाकारला जाईल आणि थकीत रक्कमेवर १० टक्के जादा आकार वसूल केला जाईल. याशिवाय महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ नुसार सक्तीच्या उपायांनी रक्कम वसूल केली जाईल.**

# जय बजरंग बलीच्या जयघोषाने कोल्हार नगरी दुमदुमली

**कोल्हार । प्रतिनिधी**

हा शनिवार दिनांक १२ एप्रिल रोजी कोल्हार येथील हनुमान मंदिरामध्ये सकाळी ६ वाजता सूर्योदयाच्या वेळी विधिवत मूर्ती पूजन आणि अभिषेक करून सामुदायिक आरतीचे आयोजन करण्यात आले. श्री भगवती माता देवालय ट्रस्टचे विश्वस्त वसंतराव खर्डे आणि विजय निबे यांना अभिषेक तसेच आरतीचा मान मिळाला. यानंतर, विजय डेंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली सामुदायिक श्री राम रक्षा स्तोत्र व श्री हनुमान चालीसा पठण सेवा झाली. असंख्य भाविक भक्त या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने श्रीरामपूर येथील प्रसिद्ध स्नेहमाला डान्स अँड ड्रामा अकॅडमीच्या २१ कलाकारांसह पंचमुखी हनुमानाचे जिवंत सादरीकरण करण्यात आले.

याप्रसंगी कोल्हारचे मा.सरपंच ड. सुरेंद्र पाटील खर्डे, उद्योजक अनिलशेठ हिरानंदानी, प्रवरा कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक श्रीकांत खर्डे, ज्ञानेश्वर खर्डे, कोल्हार बुद्रुकचे माजी उपसरपंच स्वप्निल निबे, नागपूर पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाचे कार्यकारी सदस्य ऋषिकेश खांदे, कोल्हार भगवतीपुरचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, शिवसेना जिल्हा प्रमुख महिला आघाडी उत्तर अहिल्यानगर सुनिता ताई शेळके, शिवसेना जिल्हा उपप्रमुख श्याम गोसावी, बापूसाहेब देवकर, प्रवरा सहकारी बँकेचे माजी व्हाईस चेअरमन अशोक शेठ आसावा, पत्रकार गणेश सोमवंशी, लोणी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास वाघ, पोलीस उपनिरीक्षक वनवे साहेब, कोल्हार पोलीस स्टेशनचे हेडकॉन्स्टेबल चव्हाण दादा, पल्लवीताई धनवटे आणि ओम शांती केंद्राच्या ब्रह्मकुमारी स्वाती बहन जी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात नारळ वाढवून मिरवणुकीला करण्यात आली. दरम्यान, संध्याकाळी ठीक ६ वाजता कोल्हारच्या ग्रामदैवत श्री हनुमान मंदिरासमोर पंचमुखी हनुमानाच्या जिवंत देखाव्याचे सादरीकरण करण्यात आले. भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून याचे दाद दिली. हनुमान मंदिराच्या समोरून भव्य सवाद्य आणि फटाक्यांची आतिषबाजी करत



मिरवणुकीला सुरुवात झाली.मिरवणुकीत सहभागी झालेल्या बालगोपाळांना केसरी रंगाचे पेठे बांधण्यात आले. महिला आणि पुरुषांसाठी जय श्रीराम असे प्रिंट असलेले केसरी रंगाचे स्कार्फ वितरित करण्यात आले. मिरवणुकीतील मार्गामध्ये वंदे मातरम चौक, शिवाजी महाराज चौक, नघ कॉम्प्लेक्स मधील कल्याणी साडी चौक आणि स्व. माधवराव खर्डे पाटील चौक यांचा समावेश होता. विविध चौकात सादरीकरण करून प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

याप्रसंगी शिवप्रहार संघटनेचे अध्यक्ष सुरज भाऊ आगे आणि त्यांच्या सहकारी मित्रांनी हजेरी लावली. हनुमान जन्मोत्सव समितीने यावेळी मोठ्या प्रमाणावर बुंदीचे पॅकेट प्रसाद म्हणून वाटले. तसेच, हनुमान जन्मोत्सव समितीच्या वतीने कोंची येथील गोशाळेला हिरवा चारा देण्यासाठी छोटा टेम्पो पाठवला.२००७ सालापासून दर शनिवारी सामुदायिक श्री गणपती स्तोत्र, श्री राम रक्षा स्तोत्र, श्री मारुती स्तोत्र, श्री हनुमान चालीसा, श्री कालभैरवाष्टक आणि पसायदान घेऊन समस्त हिंदूंची प्रार्थना म्हणजे श्री मंत्रपुष्पांजली अखंडितपणे (सलग ७८७ आठवडे) पठण केली जात आहे. या धार्मिक उपक्रमाची प्रेरणा घेत जवळपास ८१ गावांमध्ये सामुदायिक हनुमान चालीसा पठण सुरू झाले आहे. कोल्हार येथील राहणारे परंतु इंग्लंड, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, इंडोनेशिया, सिंगापूर या देशांमध्ये स्थायिक असलेले भक्तगणदेखील दर शनिवारी सामुदायिक श्रीराम रक्षा स्तोत्र व श्री हनुमान चालीसा पठण करतात.सामुदायिक सेवेसाठी हनुमान जन्मोत्सव समितीने सर्व स्तरांवर कौतुक मिळवले आहे. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी हनुमान जन्मोत्सव समितीचे महिला, पुरुष, तसेच बालगोपाल असे सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील होते.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती वेगवेगळ्या उपक्रमांनी साजरी

**सोलापूर । प्रतिनिधी**

क्रांतीसुर्य प्रतिष्ठान करमाळा यांच्या वतीने ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांच्या जयंतीस साजरी करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले. सकाळी पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला, त्यानंतर रक्तदान उपक्रम राबवण्यात आला. या उपक्रमात ३६ व्यक्तींनी रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्यांना क्रांतीसुर्य महात्मा फुले आणि माता सावित्रीबाई फुलेंची एकत्रित प्रतिमा भेट म्हणून देण्यात आली.

यावेळी, एच. व्ही. देसाई हॉस्पिटलच्या शेजारी नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले, ज्यात ४४ ग्रामस्थांनी भाग घेतला.



यावर्षी स्मारक आणि त्याच्या पाठीमागील शिल्प रंगरंगोटी केल्यामुळे त्या परिसराचा देखावा अतिशय सुंदर आणि आकर्षक झाला. मान्यवरांनी स्मारकाजवळ येऊन अभिवादन केले, तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्सव समितीने लेझीम नृत्य सादर केले. या कार्यक्रमात क्रांतीसुर्य प्रतिष्ठानचे सर्व सदस्य आणि प्रतिष्ठित व्यक्तींचे योगदान महत्त्वाचे होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वांनी परिश्रम घेतले, आणि महात्मा फुले यांच्या कार्याचा स्मरणोत्सव अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला.

# धाटाव,बारसोली येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात साजरा

**रोहा । प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील धाटाव एमआयडीसीजवळ रोहा-कोलाड रस्त्यावर वसलेल्या बारसोली येथील श्री हनुमान मंदिरात चैत्र पौर्णिमेनिमित्त हनुमान जन्मोत्सव अतिशय भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरा करण्यात आला.

ही उत्सवाची सलग तीसरी (३०वी) वर्ष असून, यंदाही शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी जन्मोत्सव मोठ्या भक्तीभावाने पार पडला. पहाटे ६:२६ वाजता श्री हनुमान अभिषेक व आरतीने या दिवशीच्या कार्यक्रमांना सुरुवात झाली. त्यानंतर सकाळी १० वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा पार



पडली. सायंकाळी ५ ते ७ वाजेपर्यंत भावपूर्ण भजन सेवा पार पडली. ७ वाजता सायं आरतीनंतर सुमारे १० ते ११ वाजेपर्यंत महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

या भक्तिमय सोहळ्यासाठी धाटाव, किल्ला, बारसोली, रोठ बुद्रुक, रोठ खुर्द, वरसे, महादेववाडी, तळाघर, पाले, कोलाड, उडदवणे आदी परिसरातून हजारो भाविकांनी उपस्थित राहून लाभ घेतला.

श्री हनुमान मित्र मंडळ आणि स्थानिक ग्रामस्थांच्या कुशल नियोजनामुळे संपूर्ण उत्सव अत्यंत शिस्तबद्ध आणि भक्तिमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमादरम्यान मंदिर परिसर उत्सवमय झाला होता. उपस्थित भाविक भक्तांनी भक्तिरसात न्हालेलं हे वातावरण अनुभवत संपूर्ण सोहळ्याचा आनंद लुटला. या भक्तिसंमेलनाने परिसरातील भक्तांच्या मनात श्री हनुमानप्रती श्रद्धा आणि भक्ती अधिक बळकट केली.

# महात्मा फुले यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा येथे महात्मा जोतिबा फुले यांची १९८ वी जयंती रक्तदान शिबीर, व्याख्यान आणि इतर विविध उपक्रमांनी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सकाळी आठ वाजता महात्मा फुले यांच्या नवीन आणलेल्या प्रतिमेचे पूजन विविध कार्यकारी सोसायटीचे माजी चेअरमन कल्याण अप्पा दुधे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी गावातील सरपंच, उपसरपंच, इतर सदस्य आणि मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. गहिनीनाथ मेहेर यांनी महात्मा फुले यांचा जीवनपट सांगणारे व्याख्यान दिले, ज्यामुळे उपस्थितांची मने जिंकली.

महात्मा फुले जयंती निमित्त कमला भवानी ब्लड सेंटर करमाळा आणि महात्मा फुले उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. गावातील युवकांनी सहपत्नीक रक्तदान केले. रक्तदान शिबिरास आश्चर्यकारक प्रतिसाद मिळाल्याने ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. संध्याकाळी पाच वाजता भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत जगदंबा हलगी पथक, शिवम डी जे लाईट व साऊंड सर्व्हिस कुर्डूवाडी यांचे संगीत आणि वाजत गाजत मिरवणूक काढली. मिरवणुकीदरम्यान फटाक्यांची आतषबाजी केली गेली. महात्मा फुले जयंती उत्सव पंढे कार्यक्रमात गावातील आणि कामानिमित्त बाहेर असलेल्या सर्व जातीधर्मातील लहान मोठ्या, अबाल वृद्धांनी उत्सवासाठी मोठ्या हृदयाने देणगी दिली आणि सहकार्य केले. या उत्सवाची तयारी आणि आयोजन करण्यात राजू अनारसे, भालचंद मेंढापुरे, तात्या लोंढे, गहिनीनाथ मेहेर, शोभराज दुधे, अंगद वीर पाटील, सचिन दुधे, पै. दादासाहेब दुधे, अमोल राजाराम दूधे, संतोष दुधे, अजय राऊत, पै. अतुल दुधे, भैया काळे, सचिन कुंभार यांचा विशेष पुढाकार होता. उत्सव समितीचे मार्गदर्शक म्हणून पप्पू अनारसे, प्रल्हाद मेहेर, भीमराव क्षीरसागर, गहिनीनाथ अण्णा दुधे, सुरेश दुधे, गोरख आबा अनारसे, रघुनाथ दादा दुधे, अशोक दुधे गुरुजी आणि इतर मान्यवरांचे सहकार्य लाभले. महात्मा फुले यांचे योगदान आणि विचार आजही समाजात प्रभावीपणे कार्यरत आहेत, आणि या जयंती उत्सवाने त्यांच्या विचारांची महत्त्वाची गोडी समाजात रुजवली आहे.



# बल्लारपूर पब्लिक स्कूल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती मोठ्या उत्सवात साजरी

**मूल । प्रतिनिधी**

मूल येथील शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचालित बल्लारपूर पब्लिक स्कूल, मूल येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती मोठ्या उत्साहात व श्रद्धेने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य श्री. विनोद बोलीवार सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून सौ. दुर्गा कोटगले (शैक्षणिक प्रभारी), श्री. अमोल वाळके, सौ. अश्मिता सहारे, आणि सौ. पल्लवी बोमिलवार या सर्व मान्यवरांची उपस्थिती लाभली.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला दीप प्रज्वलन व माल्यार्पण करून करण्यात आली. सौ. दुर्गा कोटगले यांनी प्रास्ताविक मनोगत व्यक्त करत बाबासाहेबांच्या



कार्याची आठवण करून दिली. त्यानंतर प्राचार्य श्री. बोलीवार सरांनी बाबासाहेबांच्या जीवनकार्यावर सखोल विचार मांडून उपस्थितांना प्रेरित केले.सर्व मान्यवरांनी आपली मनोगते व्यक्त करत बाबासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याची गरज अधोरेखित केली. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सौ. तोषी जयस्वाल यांनी केले, तर आभार प्रदर्शन कु. करिष्मा लेनगुरे हिने केले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाची सांगता 'वंदे मातरम' या राष्ट्रगानाने करण्यात आली.

# गोळवाडी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी



**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. ही जयंती गोळवाडी येथील ग्रामपंचायत कार्यालयात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या दरम्यान गोळवाडी गावचे प्रथम नागरिक म्हणून भाऊसाहेब पाटील शिंदे (सरपंच) यांच्यासह संदीप मगर (माजी सरपंच), दिगंबर वाकचौरे, ज्ञानेश्वर पगार (संगणक चालक), दीपक मगर, सुनील पगार (शालेय अध्यक्ष), गणेश मिसाळ (ग्रामपंचायत सदस्य), राहुल मगर, दगू आप्पा गावंडे (शिपाई), चंद्रकांत साळुंखे (गवळीबाबा कृषी सेवा केंद्र) आणि गावातील इतर ग्रामस्थ उपस्थित होते. जयंतीच्या दिवशी सर्वांनी एकत्र येऊन बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला आणि त्यांच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त केली. या कार्यक्रमाद्वारे बाबासाहेबांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्याद्वारे दिलेल्या समाजातील योगदानाचा गौरव करण्यात आला.

# रुद्राक्ष कॉम्प्युटर फुलसावंगी येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी; डॉ.पुंडलिक आमले यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

**उमरखेड । प्रतिनिधी**

रुद्राक्ष कंप्युटर सेंटर, फुलसावंगी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अत्यंत उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. या खास कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन, प्रतिमापूजन आणि बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी 'मी पाहिलेला बाबासाहेब', 'संविधान व बाबासाहेब' तसेच 'शिक्षण हेच खरे शस्त्र' या विषयांवर निबंध सादर करत बाबासाहेबांचे विचार प्रभावीपणे मांडले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले नामवंत सामाजिक कार्यकर्ते डॉ. पुंडलिक आमले यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाचे प्रेरणादायी पैलू उलगडले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, बाबासाहेबांचे विचार म्हणजे नवभारताचे भविष्य. शिक्षण, बंधुता, आणि न्याय या तीन स्तंभांवर उभारलेले त्यांचे तत्त्वज्ञान आजच्या पिढीने आत्मसात करणे गरजेचे आहे.यावेळी सर्पमित्र सचिन कोकणे आणि सामाजिक कार्यकर्ते संदीप भाऊ यांची देखील विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाला ग्रामस्थ, पालक, शिक्षक, तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सर्वांनी एकत्र येत बाबासाहेबांना अभिवादन केले आणि त्यांच्या विचारांप्रती निष्ठा व्यक्त केली.कार्यक्रमाच्या शेवटी निबंध स्पर्धेत यशस्वी ठरलेल्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि गौरवचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम राष्ट्रनायक डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतींनी भारलेला होता. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणिवा जागवणारा, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरलेला हा कार्यक्रम रुद्राक्ष कंप्युटर सेंटरचे संचालक योगेश राठोड यांच्या पुढाकारामुळे यशस्वीपणे पार पडला.



मुकेश जीवतोडे यांचे जीवन हे केवळ संघर्षाची गाथा नाही, तर एक प्रेरणादायी नेतृत्वाचे ठसठशीत उदाहरण आहे. तळागाळातील जनतेच्या हक्कांसाठी, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण उत्थानासाठी त्यांनी अविरत लढा दिला आहे. आज त्यांचा जन्मदिवस आहे. मात्र त्यांच्या जीवनातील प्रत्येक दिवस हा जनसेवेचा, कार्यकर्तृत्वाचा आणि निस्वार्थ समर्पणाचा आदर्श ठरलेला आहे.मुकेश जीवतोडे यांचा जन्म एका अत्यंत सर्वसामान्य कुटुंबात झाला. त्यांचे वडील सेवानिवृत्त सैनिक तर आई आजही आटा चक्की चालवत आहेत. सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि शिस्त या मूल्यांचा संस्कार त्यांच्यावर घरातूनच झाला. याच मूल्यांच्या आधारावर त्यांनी जीवनात कठोर परिश्रम करून स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. दीनदलित, उपेक्षितांपर्यंत पोहोचून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ते सातत्याने कार्यरत राहिले.गरजूंना मदतीचा हात देत त्यांनी माणूस जोपासण्याचा आदर्श निर्माण केला.

# संघर्ष यात्री : मुकेश जीवतोडे











## जिथे मुकेशजी तिथे लोकसेवा हे समीकरण

मुकेशजींनी सुरुवातीला एका कंपनीत अकुशल कामगार , म्हणून कामाला सुरुवात केली. त्यानंतर सुपरवायझर झाले .मेहनत, शिस्त आणि चिकाटीच्या जोरावर ते स्वतः ठेकेदार बनले. परंतु त्यांनी केवळ स्वतःची प्रगती न करता, आपल्या कडे येणाऱ्या कामगारांना अकुशलतेतून कुशलतेकडे नेले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आज अनेक कामगार कुशल कामगार म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या जीवनमानात लक्षणीय बदल घडवून आणण्याचे श्रेय मुकेश भाऊंना जाते.

मुकेशजी नेहमी म्हणतात, छत्रपती शिवाजी महाराज व स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे हे माझे आदर्श आहेत. त्यांनी ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण या तत्वावर आपला मार्ग निश्चित केला आहे. त्यांनी कधीच खोटे आश्वासन दिले नाही की कुणाला फसवले नाही. माणसं जोडण्याचे व जोपासण्याचे कार्य त्यांनी नेहमी केले.मुकेश जीवतोडे यांनी आपले राजकीय जीवन शिवसेनेत कार्यकर्ता म्हणून सुरू केले. ते खूपच तरुण होते, पण त्यांना समजले की, राजकारणात येऊन त्यांना समाजातील सामान्य माणसांच्या समस्या समजून त्यावर उपाय शोधावयाचे आहेत. सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी जीवाचे रान केले. यासाठी त्यांनी खूप कष्ट घेतले. गरीबांचा आवाज झाले. नम्रता आणि विश्वास या भूमिकेतून त्यांनी समाधान मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या कुटुंबाच्या पार्श्वभूमीवर त्यांचे सामाजिक व राजकीय दृष्टिकोन तयार झाले.पक्षानेही त्यांच्या गुणांची कदर केली आणि जिल्हा प्रमुख पदाची जबाबदारी सोपवली. शिवसेनेतून जिल्हा प्रमुख म्हणून नेमणूक मिळाल्यावर त्यांनी समाजोपयोगी अनेक उपक्रम राबवले. गावा-गावात नेत्र तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे घेतली. संघटनेला तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी अविरत प्रयत्न केले. जिथे मुकेशजीं तिथे लोकसेवा हे समिकरण झाले. शिवसेनेच्या संघटनेतून त्यांच्या कार्याला झळाळी मिळाली. पुढे वरोरा तालुक्यात कोळसा खाणी सुरू झाल्या. तालुक्यातील वनोजा, एकोना, मार्डा, चरुरखटी येथील शेतकऱ्यांच्या जमिनी कोळसा खदानमध्ये गेल्या होत्या. शेतकरी बांधव भूमीहीन झाले.त्यांच्या हक्काची जमीन हिसकावली गेली. परंतु त्या प्रकल्पग्रस्तांना रोजगार देण्यास वेकोली प्रशासन तयार नव्हते. त्यावेळी मुकेशभाऊ सामान्य कास्तकाराच्या बाजुने उभे राहून त्यांनी आंदोलने केली. वेकोली प्रशासनाच्या विरोधात आंदोलन करून शेकडो तरुणांना नोकरी मिळवून दिली.वेकोलीच्या कोळसा वाहतुकीमुळे अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी धुळाने व्यापल्या होत्या. शेतपिकांचे नुकसान होत होते. आणि वेकोली प्रशासन नुकसान भरपाई देण्यास टाळाटाळ करीत होते. मुकेश जीवतोडे यांच्या प्रयत्नाने त्यांनाही न्याय मिळाला. शेतकऱ्यांना मदत मिळवून दिली.वरोरा, भद्रावती तालुक्यात कोळसा खदान, पॉवर प्लांट आणि इतर प्रकल्प आहेत. त्यामध्ये बेरोजगारांना कामावर घेण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. तसेच या प्रकल्पांमध्ये काम करत असताना मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळवून दिली.२०२४ मध्ये सर्वसामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी मुकेश जीवतोडे यांनी वरोरा विधानसभा क्षेत्रासाठी विधानसभा निवडणुकीसाठी अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहण्याचा निर्णय घेतला. काँग्रेसने महाविकास आघाडीत सीट घेतली होती. त्यांना शिवसेनेचा ए बी फॉर्म मिळाला असतानाही, पक्षांतर्गत गटबाजीमुळे त्यांना अपक्ष उमेदवारी दाखल करावी लागली. उमेदवारी दाखल करतांना समर्थकांची उपस्थिती पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली होती. कुठलाही मोठा नेता पाठीशी नसताना, त्यांनी आपला प्रचार असा केला की चांदा ते बांदा या प्रचाराचे नाव घेतले जात होते. जनतेला त्यांचे कार्य महत्त्वाचे वाटले. आणि अपक्ष उमेदवार म्हणून त्यांना मोठा पाठिंबा वाढत गेला. ४९,७२० मत मिळवून ते दुसऱ्या क्रमांकावर आले. सामान्य माणसांनी आपल्या भागाचे नेतृत्व बहाल केले. यामुळे त्यांच्या कर्तृत्वाची एक नवी ओळख बनली. ते फक्त उमेदवार म्हणून नव्हे, तर एक प्रेरणा म्हणून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले.

**संपादक**
**आशिष घुमे**

> “ मंज़िलें उन्हें मिलती हैं,
> जिनके सपनोंमें जान होती है,
> पंखोंसे कुछ नहीं होता,
> हौसलोंसे उड़ान होती है! ”

मुकेश जीवतोडे यांचे नेतृत्व फक्त राजकारणापुरते मर्यादित नाही, तर ते जनतेच्या सर्वांगीण उन्नतीसाठी झटतात. शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार, महिलांसाठी त्यांनी नेहमीच आवाज उठवला आहे. अनेक शेतकऱ्यांच्या समस्यांवर उपाय शोधले आणि त्या समस्यांवर जनजागृती करण्यासाठी रस्त्यावर उतरले. त्यांनी आंदोलने केली, संघर्ष केला आणि त्या संघर्षातूनच समस्यांचे निराकरण होण्याची दिशाही दाखवली.मुकेशजींनी गावा-गावात नेत्र तपासणी शिबिरे, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित केली. याप्रकारे त्यांनी सामाजिक बांधिलकी दाखवली. हे शिबिरे केवळ आरोग्य सेवा म्हणून नव्हे, तर एक सामाजिक लढा म्हणून घेतली. याच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागातील लोकांचे आरोग्य सुधारण्याचा आणि त्यांच्या हक्कांसाठी लढण्याचा उपक्रम सुरू केला.नुकताच मुकेश जीवतोडे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय एकनाथजी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आणि चंद्रपूर लोकसभा संघटनाचे नेतृत्व स्वीकारले. त्यांचे नेतृत्व चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात एक नवा विश्वास निर्माण करत आहे. त्यांचे कार्य फक्त राजकीय निष्ठा आणि कार्यक्षेत्रावर मर्यादित नाही, तर ते समाजाच्या सर्व घटकांशी जोडलेले आहे. शेतकरी, मजूर, बेरोजगार, महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी कितीही कठोर संघर्ष केला तरी त्यात थांबले नाहीत.अविरत कार्यातून त्यांचे नेतृत्व समाजाच्या प्रत्येक स्तरापर्यंत पोहोचले आहे.मुकेश जीवतोडे यांचे जीवन युवकांसाठी एक मोठं प्रेरणादायी उदाहरण आहे. ते संघर्ष करणारे संघर्षयात्री आणि लोकांची सेवा करणारे लोकनेते म्हणून ओळखले जातात. त्यांची कार्यक्षमता आणि संघर्षाची कहाणी आज अनेकांना प्रेरणा देत आहे. जनतेच्या भल्यासाठी, त्यांच्या हक्कांसाठी आणि समाजातील सर्व घटकांच्या समृद्धीसाठी मुकेशजींनी जी कष्टांची गाथा लिहिली आहे, ती केवळ त्यांच्या कार्याचे प्रमाण नाही, तर ती एक प्रेरणा बनली आहे.१५ एप्रिल आज त्यांचा जन्मदिवस आहे. आणि त्याच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा पुनरावलोकन करतांना, आपल्याला जाणवतं की, त्यांनी कधीच आपली दिशा बदलली नाही. ते समाजाच्या उन्नतीसाठी, त्यांच्या हक्कांसाठी लढत राहिले आहेत. त्यांचे नेतृत्व फक्त भाषणांमध्ये नाही, तर क्रियेत आहे. ते कार्य करत असताना, त्यांचं नेतृत्व प्रत्येक पावलावर बदल घडवण्याचं काम करत आहे.मुकेश जीवतोडे यांचे नेतृत्व, संघर्ष, समर्पण आणि समाजसेवा हे केवळ त्यांच्या कार्याचे स्वरूप नाही, तर ते एक आदर्श आहे. त्यांच्या कार्यामुळे चंद्रपूर लोकसभा क्षेत्रात त्यांनी एक नवा लढा सुरु केला आहे, जो समाजाच्या प्रगतीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे.



सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .